ISSN: P-2455-0515 E- 2394-8450

Educreator Research Journal

OPEN ACCESS

Volume–VIII, Issues– VI
Nov – Dec 2021

Original Research Article

# सहकाराचे शिक्षणातील स्थान

[1] डॉ.संतोष सुभाष बुधवंत,

[1] सहाय्यक प्राध्यापक,सोनुभाऊ बसवंत महाविद्यालय, शहापूर

**Copyright © 2022 The Author(s):** This is an open-access article distributed under the terms of the Creative Commons Attribution 4.0 International License (CC BY-NC 4.0) which permits unrestricted use, distribution, and reproduction in any medium for non-commercial use provided the original author and source are credited.

## प्रस्तावना :-

जीवनात कोणतीही गोष्ट सहकार शिवाय शक्य होत नाही. अगदी व्यक्तीला पाणी पिण्यासाठी सुद्धा 'तोंडाला हाताचे सहकार्य' घ्यावे लागते. निसर्गातील प्रत्येक गोष्ट ही सुद्धा सहकाराचा संदेश देते. झाडे सुद्धा अनेक गोड फळे देतात पण त्यांना सुद्धा अनेक मुळांच्या सहकार्याने उभे राहावे लागते. पक्षी प्राणी यांना सुद्धा स्वतःच्या संरक्षणासाठी नेहमी कळपाने राहावे लागते. आपल्याला जीवनात मोठे होण्यासाठी, प्रगतीसाठी देखील अनेकांच्या सहकार्याची गरज असते.

एकूणच सहकार हाच जीवनाचा खरा आधार असताना त्याबद्दल मोठ्या प्रमाणात समाज जागृती करण्याची गरज असताना व जेथे त्याचे महत्त्व पोहोचले नाही तिथे ते अभ्यास रूपात पोहचविण्याचे कार्य करणारे विशेष शिकवीले जाण्याची गरज असताना सुद्धा सहकारसारखा विषय अभ्यासक्रमातून वगळला जात आहे. ही मोठी चिंतेची बाब आहे .

**संशोधनाचे महत्व :**

मुंबई ही आर्थिक उलाढाली बाबत भारतीय अर्थव्यवस्थेच्या म्हणून ओळखली जाते. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील सर्व आर्थिक व्यवहारांचे चे मूळ स्थान म्हणून मुंबईकडे पाहिले जाते. जगातील प्रमुख शहरांमध्ये लोकसंख्येच्या बाबतीत मुंबई हे शहर दुसऱ्या क्रमांकावर आहे की, ज्याची लोकसंख्या 14 मिलीयन इतकी आहे. तर कोकणातील विविध जिल्ह्यांमध्ये सर्वात प्रमुख व मोठा असलेला ठाणे जिल्ह्याची लोकसंख्या ही जवळ-जवळ एक कोटीच्या आसपास आहे. इतकी मोठी लोकसंख्या असणाऱ्या मुंबई विद्यापीठाअंतर्गत असणाऱ्या महाविद्यालयात अर्थशास्त्र या विषयांतर्गत सहकाराचा अभ्यासक्रम शिकवला जात असेल. महाराष्ट्राच्या आर्थिक विकासात सहकार्याचा सिंहाचा वाटा असताना त्यातील मुंबई व कोकण विभागाचा सहभाग किती? याचा पुनर्विचार होणे गरजेचे आहे.

सतत धावपळीचे जीवन जगणारे मुंबई तर हे विभक्त व्यवस्थेचे पुरस्कर्ते झालेले आहेत. नाते, संस्कार, घरातील मोठे,

त्यांचा आदर या सर्व महत्वपूर्ण गोष्टींपासून हि मुंबई संस्कृती मुळातच पळ काढत असताना, या तरुण पिढीला घरातून एकमेकांचे सहकार्य, मदत विचारांची देवाण-घेवाण इत्यादी गोष्टी शिकविणारे फारसे कोणी नसताना, एक पुस्तक रूपाने तरी सहकार म्हणजे काय? त्याचे महत्त्व काय? सहकारशिवाय विकास कसा अशक्य आहे? सहकाराची परंपरा, संस्कृती, निसर्गाची शिकवण इत्यादी एकजुटीचे, समता व समानतेचे शिक्षण देणारे विषय सुद्धा आता बंद करून आपण आपल्या पुढील भविष्याचे नुकसान करीत आहोत.

**संशोधनाची उद्दिष्टे :**

१) विभागानुसार व प्रकारानुसार सहकारी संस्थेचा अभ्यास करणे.

२) महाराष्ट्रामध्ये सहकारी क्षेत्रातील झालेली रोजगार निर्मितीचा अभ्यास करणे.

**संशोधनाची गृहीतके** :

| अं. क्र. | संस्थांचा प्रकार | मुंबई विभाग | कोंकण विभाग | महाराष्ट्र राज्य एकूण |
|---|---|---|---|---|
| 1 | प्राथमिक शेती पतसंस्था | 00 | 1044 | 20235 |
| 2 | कृषक सेवा संस्था | 00 | 03 | 20 |
| 3 | आदिवासी संस्था | 00 | 136 | 944 |
| 4 | प्राथमिक सहकारी बँका | 71 | 34 | 603 |
| 5 | पगारदार नोकरांच्या पतसंस्था | 819 | 606 | 7222 |
| 6 | इतर बिगर शेती संस्था | 1899 | 1793 | 17278 |
| 7 | पणन संस्था (मध्यवर्ती व प्राथमिक) | 02 | 123 | 1474 |
| 8 | साखर कारखाने | 00 | 00 | 175 |
| 9 | भात गिरण्या | 00 | 33 | 90 |
| 10 | सूत गिरण्या | 00 | 02 | 113 |
| 11 | प्राथमिक हातमाग व यंत्रमाग संस्था | 12 | 71 | 1855 |
| 12 | ग्राहक भांडार (मध्यवर्ती व प्राथमिक) | 516 | 479 | 3403 |
| 13 | सहकारी गृहरचना संस्था | 20012 | 25260 | 73903 |
| 14 | दुग्ध संस्था (मध्यवर्ती व प्राथमिक) | 516 | 479 | 3403 |
| 15 | इतर प्राथमिक औद्योगिक संस्था | 922 | 809 | 7751 |
| 16 | मच्छीमार संस्था (मध्यवर्ती व प्राथमिक) | 54 | 355 | 2872 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 17 | उपसा जलसिंचन संस्था | 00 | 259 | 9714 |
| 18 | जंगल कामगार संस्था | 00 | 77 | 306 |
| 19 | मजूर सहकारी संस्था | 743 | 1098 | 10285 |
| 20 | औद्योगिक वसाहती | 47 | 26 | 224 |
| **21** | इतर संस्था | 3,077 | 1772 | 20739 |
| **22** | एकुण संस्था | 28,188 | 34604 | 205753 |

सहकाराचा आणि आर्थिक विकासाचा सहसंबंध आहे.

महाराष्ट्राच्या आर्थिक विकासात सहकाराचा वाटा विविध स्वरूपात दिसून आला आहे की ज्यात मुंबई उपनगर धरून मुंबई विभाग, ठाणे, रायगड, सिंधुदुर्ग-रत्नागिरी मिळून कोकण विभाग, धुळे नाशिक नंदुरबार जळगाव अहमदनगर मिळून नाशिक विभाग, पुणे व सोलापूर मिळून पुणे विभाग, सातारा सांगली कोल्हापूर मिळून कोल्हापूर विभाग, औरंगाबाद जालना परभणी हिंगोली मिळून औरंगाबाद विभाग, बुलढाणा अकोला वाशिम अमरावती यवतमाळ मिळून अमरावती विभाग, आणि वर्धा नागपूर भंडारा गोंदिया चंद्रपूर गडचिरोली मिळून नागपूर विभाग इत्यादींचा समावेश होतो सहकारातून होणाऱ्या महाराष्ट्राच्या विकासात मुंबई विभाग व कोकण विभागाचा वाटा उर्वरित महाराष्ट्राच्या तुलनेत खूपच कमी आहे हे आपणास पुढील कोष्टकावरून स्पष्ट होईल

## विभागानुसार व प्रकारानुसार सहकारी संस्था 2008

**संदर्भ: महाराष्ट्रातील सहकारी चळवळ एक दृष्टिक्षेपात 2008**

वरील कोष्टकात मुंबई विभागात आठ प्रकारच्या सहकारी संस्था शून्य आहेत तर एकूण 28,188 संस्था पैकी 20012 संस्था या सहकारी गृहनिर्माण संस्था आहेत. तर कोकण विभागातील एकूण 34,601 संस्था पैकी 25,260 संस्था या सहकारी गृहनिर्माण संस्था आहेत की, ज्यामुळे नंतर कोणताही निर्माणक्षम रोजगार निर्माण होत नाही ना उत्पन्न निर्माण होते. याउलट अनेक सहकारी गृहनिर्माण संस्थांमध्ये वाद-विवाद, कोर्टबाजी, असहकार इत्यादी ला मात्र उधाण आलेले असते.

ज्या संस्था रोजगार निर्माण करतात, राष्ट्रीय उत्पन्न वाढवितात दरडोई उत्पन्नात वाढ करतात, राहणीमान व जीवनमानात सुधारणा करतात, विभागीय असमतोल दूर करून विभागीय विकासाला फार लावतात अशा सहकारी संस्था मात्र नगण्य आहे आहेत. ज्यामध्ये सहकारी साखर कारखाने, सहकारी सूतगिरण्या, सहकारी दुग्ध व्यवसाय संस्था, त्या अनुषंगाने येणारे कागद कारखाने, मद्य निर्मिती कारखाने, इंजिनिअरिंग कॉलेज, मेडिकल कॉलेज बी.एड् डी.एड् कॉलेज, कला व वाणिज्य महाविद्यालय आणि इतर शैक्षणिक संस्था व सहकारी संस्था यांचा अभाव आहे. शिक्षणातून रोजगाराच्या संधी चे ही ज्ञान व्हावे अशा स्वरूपाचे शिक्षण सहकार हा विषय देत असतो. लाखो सुशिक्षितांना रोजगार पुरविण्याचे काम सहकार क्षेत्रातून केले जात आहे.

**महाराष्ट्रात सहकारी क्षेत्रात झालेली रोजगार निर्मिती (संख्या लाखांमध्ये)**

| अं. क्र. | बाब | संख्या |
|---|---|---|
| 1 | 2001 च्या जनगणनेनुसार काम करणाऱ्यांची संख्या | **411.73** |
| 2 | मार्च 2000 अखेर सार्वजनिक व खाजगी क्षेत्रात झालेली रोजगार निर्मिती | **30.40** |
| 3 | सार्वजनिक व खाजगी क्षेत्रातील रोजगार निर्मितीचे एकूण काम करणाऱ्या संख्येची टक्केवारी | **7.38** |
| 4 | मार्च 2008 अखेर सहकार क्षेत्रातील रोजगार निर्मिती | **3.88** |
| 5 | सहकार क्षेत्रातील रोजगार निर्मिती ची एकूण निर्मिती टक्केवारी | **0.94** |

**महाराष्ट्राची आर्थिक पाहणी 2008-09, अर्थ व सांख्यिकी संचालनालय मुंबई**

(*यामध्ये दुग्ध संस्था, पशु उत्पन्न संस्था, मच्छिमार संस्था, साखर कारखाने यांचा समावेश नाही*)

**निष्कर्ष:**

रोजगाराच्या संधीचे ज्ञान देणारा व प्रत्यक्ष रोजगार पुरविणाऱ्या ‘सहकार या विषयाकडे मुंबई विभागाचे दुर्लक्ष होत आहे. विषय किंवा अभ्यासक्रम हा केवळ अभ्यासापुरता किंवा गुण मिळविण्या पुरताच मर्यादित नसतो काही अभ्यासक्रम हे सामाजिक जागृती, नीतिमूल्यं, एकता, अखंडता इत्यादी सारख्या गोष्टी ज्या कोणत्याही बाजारामध्ये विकल्या जात नाहीत, ज्या पैशाने खरेदी करता येत नाही व ज्या शिकल्याशिवाय जीवनातील इतर शिक्षणाला खऱ्या अर्थाने किंमत मिळत नाही व ती टिकविता येत नाही यासाठी शिकणे गरजेचे असते अशाच पैकी सहकार हा विषय आहे.

जीवनातील सहकारची भावना आपण दिवसेंदिवस गुंडाळत असतानाच विषयाला सुद्धा बगल देऊन आपण मुंबईकर म्हणजे खूप व्यवहारी असे समजत असू तर आपण आपल्या तरुण पिढीला सहकारविना विकास शिकवण्याचा प्रयत्न करीत आहोत असे म्हणावे लागेल कि जे निसर्ग नियमाच्या विरुद्ध आहे.

संदर्भ ग्रंथ :

1) महाराष्ट्रातील सहकारी चळवळ एक दृष्टिक्षेप 2008

2) महाराष्ट्राची आर्थिक पाहणी 2008-09, अर्थ व सांख्यिकी संचालनालय मुंबई

***Cite This Article:***

***डॉ.संतोष सुभाष बुधवंत, (2021).** सहकाराचे शिक्षणातील स्थान, Educreator Research Journal VIII (VI), 177 -180.*